महाराष्ट्र शासन

# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

दूरध्वनी क्र.०२०-२५६५६२३४/२५६५७१७६
Email ID : ropune@dtemaharashtra.gov.in

४१२-ई, शिवाजीनगर, पुणे - ४११ ०१६.

जा.क्र. : तंशिविकापु/विवि/प्रवेश गुणवत्ता यादी तपासणी २०२०-२१/२०२१/ १६४८    दिनांक : २६.०३.२०२१

**महत्वाचे परिपत्रक (गुणवत्ता यादी तपासणी - पदवी/पदव्युत्तर पदवी)**

प्रति,
प्राचार्य/संचालक,
शासकीय, अशासकीय अनुदानित व खाजगी विनाअनुदानित
पदवी, पदव्युत्तर पदवी, अभियांत्रिकी/औषधनिर्माणशास्त्र/
व्यवस्थापनशास्त्र/वास्तुशास्त्र अभ्यासक्रमाच्या संस्था,
पुणे विभाग

**विषय : शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील संचालनालयांतर्गत असलेल्या व्यावसायिक पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमात प्रवेशित विद्यार्थ्यांची प्रवेश पडताळणी व प्रवेश मान्यतेची प्रक्रिया...**

**संदर्भ :**
**१) महाराष्ट्र विनाअनुदानीत खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम, २००५ दिनांक ५७/०८/२०५५**
**२) मा.सचिव , प्रवेश नियामक प्राधिकरण यांचे पत्र क्रमांक संकीर्ण /२२२१/प्र.क्र.०१/प्रनिप्रा/१८६ दिनांक ०८/०२/२०२१**
**३) मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र जा.क्र.२ अ/एडीएम/२०२५/८७ दि. ५५.०२.२०२५.**
**४) या विभागीय कार्यालयाचे परिपत्रक जा.क्र. तंशिविकापु/विवि/प्रवेश गुणवत्ता यादी तपासणी २०२०-२१/२०२१/१०२२ दिनांक २५.०२.२०२१**

शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील संचालनायांतर्गत असलेल्या व्यावसायिक पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रिया पूर्ण झालेली आहे. महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम, २०१५ मधील कलम ९(५) च्या तरतुदीनुसार प्रवेशित विद्यार्थ्यांच्या मान्यतेबाबतची कार्यपध्दती विहीत करण्यात आलेली आहे.

संदर्भ क्रमांक ४ मधील परिपत्रकानुसार, कोव्हीड-१९ च्या प्रादुर्भावामुळे या विभागीय कार्यालयांतर्गत येणा-या जिल्ह्यांमधील संस्थांच्या शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील **पदवी व पदव्युत्तर पदवी** अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र व्यवस्थापनशास्त्र, वास्तुशास्त्र इत्यादी अभ्यासक्रमास प्रवेशित विद्यार्थ्यांचे गुणवत्ता यादी पडताळणी संबंधित जिल्ह्यातील शासकीय/अशासकीय अनुदानित संस्थांमध्ये करण्यात आलेली आहे.

**सर्व पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या** संस्थांना सूचित करण्यात येते की, संस्थांनी त्यांना नेमून दिलेल्या तपासणी केंद्रांकडून प्रवेश गुणवत्ता यादी तपासून घेतल्यानंतर या विभागीय कार्यालयाकडून तपासणी प्रमाणपत्र प्राप्त करणेकरीता अद्यापही संपर्क साधला नाही अशा संस्थांनी दिनांक ३१.०३.२०२१ पर्यंत या विभागीय कार्यालयाकडे गुणवत्ता याद्यांची फाईल्स चेकलिस्टप्रमाणे कागदपत्रे तपासून घेऊन जमा कराव्यात. **३१.३.२०२१ पूर्वी ज्या संस्था या विभागीय कार्यालयाकडे फाईल्स जमा करणार नाहीत अशा संस्थांमधील व्यावसायिक अभ्यासक्रमातील प्रवेशांना प्रवेश नियामक प्राधिकरणाची अंतिम मान्यता प्राप्त न झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संस्थाप्रमुखांची राहील याची नोंद घ्यावी.**

[signature] 26/03/21
(एम. आर. जाधव)
सहायक संचालक (तां)
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

..Yogesh Kelkar\Admission 2020-21\Degree Admission\Merit list\Merit list letter and cirucular.docx